महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ 16 /२०२२ दि. 16/०२/२०२२

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**संदर्भ :–** १) जा.क्र./भिनिशमनपा/बांध/१६४ दिनांक १२/०१/२०२२
२) OW/DCP TRAFFICTHN/ADM/NOTIFICATION/80 DATE 09/10/2021
३) भिवंडी वाहतूक उपविभाग यांचे कडील जा.क्र. ५३/२०२२, दि. २/०२/२०२२.
४) जा.क्र./सपोआ/वा.वि.भिवंडी/५०/२०२२ दिनांक ०२/०२/२०२२

———oooo———

**ज्याअर्थी,** भिवंडी शहरात भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीत स्व. राजीव गांधी उड्डाणपुलाची ओव्हरले डेक स्लॅब, बॉटम स्लॅब आणि गर्डरची दुरूस्ती, सुधारणा व मजबुतीकरणाचे कामासाठी एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा. लिमी. कंपनीस उप आयुक्त (मुख्या.) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी यांचे कडील जा. क्र. भिनिशमनपा/बांध/९९५/२०२१, दि. १२/०४/२०२१ अन्वये सदरचे काम करण्याचा कार्यदिशान्वये व संदर्भ क्रमांक ०२ अन्वये वाहतुक विभागाकडील अधिसुचनेनुसार स्व. राजीव गांधी उड्डाणपुल दिनांक ३१/०१/२०२२ रोजीपावेतो वाहतुकीस बंद ठेवण्यात आला होता. भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी यांचेकडुन संदर्भ क्रमांक ०१ अन्वये उपरोक्त काम सुरू असताना उड्डाणपुलाच्या पीअर P16,P17, P18 या दोन स्पॅन मधील १२ पॉट पीटी बेअरिंगस खचुन निकामी झाल्याचे आढळुन आल्याने सदर उड्डाणपुलाचे बेअरिंगस बनविणे व बसविणे या करिता २८ फेब्रुवारी २०२२ पर्यंत काम पुर्ण करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन असलेबाबतचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले आहे.

त्याकरीता स्व. राजीव गांधी उड्डाणपूल दुरूस्तीकरीता वाहतुकीस बंद ठेवून पर्यायी मार्गाने वाहतूक वळविणे आवश्यक आहे. सदरच्या कामाचा त्रास नागरिकांना, शालेय विद्यार्थ्यांना, अॅब्युलन्स इत्यादी वाहनांना होवू नये व वाहतूक सुरळीत व सुरक्षित चालावी याकरीता व आम जनतेच्या सोईसाठी भिवंडी शहरात येणाऱ्या मल्टीअॅक्सेल वाहन, ट्रक, मोठे टेम्पो व माल वाहतूक करणारी सर्व प्रकारची मोठी चार चाकी व त्यावरील वाहने या प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करून पर्यायी मार्गाने वाहतूक वळविणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, बाळासाहेब पाटील, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर मला ठाणे शहर म्हणून महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र. एम.व्ही.ए. ११६/सीआर/३७/टीआर/दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार व मोटार वाहन कायदयाचे कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) व ११७ अन्वये प्राप्त अधिकारानुसार व त्या अनुषंगिक कर्तव्यार्थ खालील प्रमाणे अधिसूचना निर्गमित करीत आहे.

**प्रवेश बंदी :–** १) नदीनाका (शेलारगांव) येथून भिवंडी शहरात, धामणकर नाका मार्गे अंजूर फाटाकडे जाणाऱ्या जड अवजड वाहने ट्रक, मोठे टेम्पो, आयसर ११०९ सह, डंपर, ट्रेलर, कंटेनर, खाजगी बसेस्, लक्झरी बसेस् इ. वाहनांना वंजारपट्टी नाका व वंजारपट्टी नाक्यावरील ब्रिज येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने ही वंजारपट्टी नाका व वंजारपट्टी ब्रिज येथून डावे बाजूस वळण घेवून चाविंद्रा रोडने वडपा येथून रा. म.क्र. ३ वरून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंदी :–** २) चाविंद्रा नाका येथून भिवंडी शहरात, धामणकर नाका मार्गे अंजूर फाटा कडे जाणाऱ्या जड अवजड वाहने ट्रक, मोठे टेम्पो, आयसर ११०९ सह, डंपर, ट्रेलर, कंटेनर, खाजगी बसेस्, लक्झरी बसेस् इ. वाहनांना चाविंद्रा येथेच **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने ही चाविंद्रा नाका येथेच वळून चाविंद्रा रोडने वडपा येथून रा.म.क्र. ३ मार्गाने माणकोली येथे उजवीकडे वळून इच्छित जातील.

**प्रवेश बंदी :–** ३) रांजणोली नाका येथून भिवंडी शहरातून शेलार गांव, वाडा, मनोरकडे जाणारी जड अवजड वाहने ट्रक, मोठे ट्रक, मोठे टेम्पो, आयसर ११०९ सह, डंपर, ट्रेलर, कंटेनर, खाजगी बसेस्, लक्झरी बसेस् इ. वाहनांना रांजणोली नाका येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने ही रांजणोली नाक्यावरून मुंबई नाशिक महामार्गाने वडपा, चाविंद्रा, वंजारपट्टी नाका ब्रिज वरून उजवीकडे वळण घेऊन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंदी :–** ४) रांजणोली नाका येथून भिवंडी शहरातून धामणकर नाका मार्गे अंजूर फाटा वसईकडे जाणारी जड अवजड वाहने ट्रक, मोठे टेम्पो, आयसर ११०९ सह, डंपर, ट्रेलर, कंटेनर, खाजगी बसेस्, लक्झरी बसेस् इ. वाहनांना रांजणोली नाका येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.



Scanned with CamScanner

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने ही रांजणोली नाक्यावरून नाशिक मुंबई महामार्गाने माणकोली नाका येथून ब्रिजच्या खालून उजवीकडे वळण घेऊन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंदी :–** ५) अंजुर फाटा येथून धामणकर नाका मार्गे भिवंडी शहरातून वाडा, रांजणोली नाका व कल्याणकडे जाणाऱ्या जड अवजड वाहने ट्रक, मोठे टेम्पो, आयसर ११०९ सह, डंपर, ट्रेलर, कंटेनर, खाजगी बसेस्, लक्झरी बसेस् इ. वाहनांना अंजूर फाटा येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने ही अंजूर फाटा येथून वळ–वळपाडा, दापोडा रोडने माणकोली नाका येथून डावीकडे वळण घेवून मुंबई–नाशिक महामार्गाने इच्छित स्थळी जातील.

**वाहतुक मुभा :–** ६) नदीनाका (शेलारगाव), चाविंद्रा नाका, रांजणोली नाका तसेच अंजूर फाटा येथून भिवंडी शहरात येणाऱ्या ४ व ६ चाकी ट्रक/टेम्पो व इतर हलक्या वाहनांना रात्रौ. ००:०१ वा. ते सकाळी ०५:०० वा. पावेतो वाहतुकीस मुभा देण्यात येत आहे.

**प्रवेश बंदी :–** ७) नदीनाका (शेलार) व चाविंद्रा येथून भिवंडी शहरात, धामणकर नाका मार्गे अंजूर फाटाकडे जाणारी तसेच नवीवस्ती, रांजणोली, कल्याणकडे जाणारी सर्व प्रकारच्या वाहनांना स्व. राजीव गांधी उड्डाणपुलावर बागेफिरदोश येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने ही स्व. राजीव गांधी उड्डाणपुलावरून न जाता उड्डाणपुलाचे बाजूस असलेल्या रस्त्याने एस.टी. स्टॅण्ड, आय.जी.एम.गेट, दिघे चौक, अशोकनगर गेट नं.२, कल्याण नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंदी :–** ८) अंजूर फाटा येथून धामणकर नाका मार्गे स्व. राजीव गांधी उड्डाणपुलावरून वाडा, शिवाजी चौक, नाशिककडे तसेच रांजणोली नाका, कल्याणकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना सहायक पोलीस आयुक्त, भिवंडी पूर्व विभाग जवळील स्व. राजीव गांधी उड्डाणपुलाचे रॅम्पचे सुरवातीस **" प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** १) वाडा, शिवाजी चौक, नाशिककडे जाणारी वाहने उड्डाणपुलावरून न जाता उड्डाणपुलाचे बाजूस असलेल्या रस्त्याने कल्याण नाका–एस.टी.स्टॅण्ड–बागे फिरदोश मार्गे इच्छित स्थळी जातील.

२) तसेच रांजणोली नाका, कल्याणकडे जाणारी सदरची वाहने उड्डाणपुलावरून न जाता उड्डाणपुलाचे बाजूस असलेल्या रस्त्याने कल्याण नाका येथे उजवीकडे वळून नवीवस्ती मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंदी :–** ९) स्व. बाळासाहेब ठाकरे उड्डाणपुलावरून येणाऱ्या वाहनांना वाडा, बागेफिरदोश, छ. शिवाजी महाराज चौक, चाविंद्रा नाका, नदीनाक्याकडे जाण्यासाठी स्व. राजीव गांधी उड्डाणपुलाचा वापर न करता साईबाबा जकात नाका येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने ही साईबाबा जकात नाका येथे स्व. बाळासाहेब ठाकरे उड्डाणपुलावर न चढता उड्डाणपुलाचे बाजूस असलेल्या रस्त्याने भादवड नाका–के.बी.चौकी–नवीवस्ती–नेहरूनगर–आसबिबी–कल्याण नाका येथे उजवीकडे वळण घेवून दिघे चौक–एस.टी.स्टॅण्ड, बागेफिरदोश मार्गे इच्छित स्थळी जातील.

**वाहतुक मुभा :–** १०) स्व.बाळासाहेब ठाकरे उड्डाणपुलावरून स्व.राजीव गांधी उड्डाणपुलावरून धामणकरनाका, अंजूरफाटाकडे जाणाऱ्या दुचाकी, तीनचाकी, चारचाकी हलकी वाहने, छोटे टेम्पो, कार अशा वाहनांना प्रवेश देण्यात येत आहे.

**वाहतुक मुभा :–** ११) वडपा, चाविंद्रा नाका येथून शेलारगांव, वाडा, गुजरातकडे जाणारी जड अवजड वाहने ट्रक, मोठे टेम्पो, आयसर ११०९ सह, डंपर, ट्रेलर, कंटेनर, खाजगी बसेस्, लक्झरी बसेस् इ. वाहने भिवंडी शहरात न येता वंजारपट्टी ब्रिजवरून उजवीकडे वळून नदीनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**नो पार्किंग :–** १२) सदर काम करतांना वंजारपट्टी नाका ते धामणकरनाका अशी वाहतूक हळुवारपणे जाणार आहे, परंतू वाहतूक कोंडी होवू नये याकरीता उड्डाणपुलाचे काम सुरू झाले पासून पुढे संपूर्ण काम होई पावेतो देवजीनगर ते नदीनाका पर्यंत रस्त्याच्या दोन्ही वाहिनीवर सर्व प्रकाराच्या वाहनांना पार्किंग करण्यास मनाई (नो–पार्किंग झोन) करण्यात येत आहे.

**संदर्भ क्रमांक ०२ अन्वये नमुद कामासाठी अधिसुचना निर्गमित करण्यात आलेली होती परंतु सदर उड्डाणपुलाचे काम पुर्ण न झाल्याने सदरची अधिसूचना दि. ०१/०२/२०२२ ते २८/०२/२०२२ पर्यंत उड्डाण पुलाचे बेअरिंगस बदलण्याचे कामासाठी अंमलात राहील.**

**तसेच सध्या अवजड वाहनाच्या बंदी संदर्भात निर्गमित केलेल्या अधिसूचना अबाधित राहून सदरचे काम पूर्ण झाल्यानंतर या पूर्वी अवजड वाहनाच्या बंदी संदर्भात निर्गमित केलेल्या अधिसूचना पुर्वी प्रमाणे अबाधित राहतील.**

सदरची अधिसूचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, अन्नधान्य/भाजीपाला, डिझेल, पेट्रोल, गॅस, पाणी, दुध, औषधे यांची वाहतूक करणारी वाहने, मिनी स्कूल बसेस् तसेच सर्व शासकीय/निमशासकीय व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( बाळासाहेब पाटील )**
पोलीस उप आयुक्त
वाहतूक विभाग, ठाणे शहर.



Scanned with CamScanner

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे

२/– आपणास विनंती करण्यात येते की, सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत, माहितीसाठी सविनय सादर**

१) मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
२) मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
३) मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
४) मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
४) मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
५) मा. आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
६) पोलीस उप आयुक्त परिमंडळ–२ भिवंडी/विशेष शाखा ठाणे.
७) नियंत्रण कक्ष, ठाणे/भिवंडी

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.

प्रतः– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/– सदरची अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सहायक पोलीस आयुक्त, वाहतूक विभाग, भिवंडी/ठाणे व पो.निरी. भिवंडी, नारपोली, कोनगांव, कापूरबावडी, कळवा वाहतूक उपविभाग ठाणे.



Scanned with CamScanner